प्राथमिक आरोग्य केंद्रात येणा-या रूग्णांकडून आकारल्या जाणा-या शुल्काच्या विनियोजनाबाबत मार्गदर्शक तत्वे.

---

नोंदणी शुल्काद्वारे जमा झालेल्या निधीतून छपाई साहित्यावरील [स्टेशनरीवरील] खर्च करण्यास मंजुरी देण्याबाबत.

12 OCT 1998

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन पुरकपत्र क्र. पीएचसी-१०९३/३५०७/प्र.क्र. ४१४/आरोग्य-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- २८ सप्टेंबर, १९९८.

वाचा:- १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. पीएचसी-१०९३/३५०७/प्र.क्र. ४१४/आरोग्य-४, दिनांक:-६ मार्च, १९९७.

२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे क्र. संआरो/निविमू/६६/टे-५/क-७/९७, दिनांक ३० सप्टेंबर, १९९७ चे पत्र.

प्रस्तावना:-

वरील क्रमांक १ येथील शासन निर्णय, दिनांक ६ मार्च १९९७ अन्वये राज्यातील निरनिराळ्या जिल्हा परिषदांच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात येणा-या रूग्णांकडून वसूल करण्यात येणा-या नोंदणी शुल्काच्या रकमेत एकसूत्रीपणा असावा म्हणून त्यात वाढ करण्यात येवून प्रति रूग्ण रूपये २/- इतकी नोंदणी शुल्क आकारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णयामध्येच सदरहू नोंदणी शुल्काद्वारे जमा झालेल्या रकमेचा विनियोग कश्याप्रकारे करण्यात यावा याबाबतची मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. याबाबत सदरहू नोंदणी शुल्काद्वारे जमा होणा-या रकमेतून प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी लागणारे आंतररूग्ण पेपर्स, बाह्यरूग्ण पेपर्स पोस्ट मार्टेम फॉर्म्स तसेच विविध आरोग्य कार्यक्रमांतर्गत लागणारे विविध फॉर्म्स व रजिस्टर्स व इतर छपाई साहित्य यावरील खर्च करण्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव काही काळ शासनाच्या विचाराधीन होता.

पुरकपत्र:-

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे रूग्णांच्या नोंदणी शुल्काद्वारे जमा झालेल्या रकमेचा विनियोग कोणत्या बाबींवर करावा याबाबतची मार्गदर्शक तत्वे देण्यात आली आहेत. त्या व्यतिरिक्त शासन हया पुरकपत्राद्वारे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी लागणारे आंतररूग्ण पेपर्स, बाह्य रूग्ण पेपर्स, पोस्ट मार्टेम फॉर्म्स, तसेच विविध आरोग्य कार्यक्रमांतर्गत लागणारे विविध फॉर्म्स, रजिस्टर्स व इतर स्टेशनरीकरिता व छपाई साहित्याकरिता प्रतिवर्षी रूपये ९०००/- इतक्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यास शासन मंजुरी देत आहे. परंतु अशी खरेदी/छपाईचे काम करण्यापूर्वी सदरचे छपाई साहित्य

...कृ. मा. प.

शासकीय प्रिंटींग प्रेस कडून पुरविण्यात येणार नाही असा दाखला प्राप्त करुन घेण्याच्या बाबींची पूर्तता करुन घेणे आवश्यक आहे.

२. शासन निर्णय दिनांक ६ मार्च १९९७ मधील मार्गदर्शक तत्व क्रमांक ३ व तत्व क्रमांक ५ नुसार मार्गदर्शित केलेल्या बाबींवर प्रतिवर्षी रुपये १२०० पर्यंत खर्च करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्या बाबींवर त्याऐवजी रुपये १५००/- पर्यंत खर्च करण्यास देखील शासन आता मंजुरी देत आहे.

३. मार्गदर्शक तत्व क्रमांक ५ मध्ये यापूर्वी ज्या बाबी दिल्या आहेत त्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपकरणे व पंखे दुरुस्तीवरील खर्च या बाबींचा देखील आता अंतर्भाव करण्यात येत आहे.

४. नोंदणी शुल्काद्वारे जमा झालेल्या रकमेचा विनियोग करण्याबाबतची इतर मार्गदर्शक तत्वे ही शासन निर्णय दिनांक ६ मार्च १९९७ मध्ये विहित केल्याप्रमाणेच बंधनकारक आहेत.

५. सदर शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ र. ग. गोसावी ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा [निविमु] मुंबई.
सहसंचालक, आरोग्य सेवा [आरोग्य] पुणे.
सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा, सर्व मंडळे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद [सर्व]
महालेखापाल [लेखा परीक्षा]/[लेखा व अनुज्ञेयता], मुंबई/नागपूर.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक लेखा व निधी, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग [व्यय-१३], मंत्रालय, मुंबई.
कार्यासन अधिकारी [आरोग्य-३]/अर्थसंकल्प, सार्वजनिक आरोग्य अधिकारी,
मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती, आरोग्य-४.

मपा/-